सौ. निकीता प्रशांत राऊत
वि. श्री. प्रशांत राऊत व इतर
**CNRNO**.**MHPU**13-001685-2021

## कौ.हिं.का. अर्ज क्रमांक २७/२०२१ मधील नि. ५ वरील आदेश

अर्जदार हिने सदरचा अर्ज जाबदेणार यांच्याविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ नुसार तुर्तातुर्त पोटगी व खर्च मिळावा यासाठी दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –**

२. अर्जदार हिचे लग्न जाबदेणार क्र. १ सोबत एकमेकांच्या पसंतीने व नातेवाईकांच्या मध्यस्थीने दि. २७/११/२०२० रोजी जेऊर, ता. पुरंदर, जि. पुणे येथे झाले असून लग्नाचा संपुर्ण खर्च अर्जदार हिचे वडिलांनी केला. तसेच जाबदेणार क्र. १ यास मानपानासाठी रक्कम रु. ५०,०००/– रोख दिले होते. लग्नानंतर अर्जदार ही जाबदेणार क्र. १ याचे घरी नांदण्यास गेली. जाबदेणार यांनी अर्जदार हिस साधारण दोन महिने व्यवस्थित नांदविले. अर्जदार ही पुणे शहरात राहिलेली असली तरी जाबदेणार यांच्या घरातील कामधंदा व्यवस्थित करुन मनापासून नांदत होती. तरीसुध्दा जाबदेणार क्र. १ हा जाबदेणार क्र. ३ हिचे सांगणेवरुन किरकोळ कारणावरुन अर्जदार हिस त्रास देवू लागला.

३. तसेच जाबदेणार क्र. १ याचा मौजे कुळधरण, ता. कर्जत येथे स्लायडिंग व फर्निचरचा व्यवसाय असून जाबदेणार क्र. १ व जाबदेणार क्र. ४ चे पती यांची दुकाने समोरासमोर असल्याने त्यांच्या दररोज भेटीगाठी होत असल्याने जाबदेणार क्र. ४ ही कोणतेही कारण नसतांना जाबदेणार क्र. १ यास अर्जदार क्र. १ बाबत सांगून, चिथावणी देवून अर्जदार हिस त्रास देण्यास भाग

पाडु लागली. तसेच जाबदेणार क्र. २ व ३ हे कोणतेही कारण घडत नसतांना अर्जदार हिस लग्नातील मानपानावरुन अपमानित करुन माहेरच्या लोकांबाबत अपशब्द बोलत असतांना देखील सदर बाब अर्जदार हिने माहेरी सांगितली नाही. काही दिवसानंतर जाबदेणार यांनी अर्जदार हिस मानसिक त्रास देवून अपमानित करण्यास सुरुवात केली. तसेच अर्जदार ही शेजारील लोकांसोबत बोलली तरीदेखील जाबदेणार क्र. १ हा तिचेवर संशय घेवू लागला. जाबदेणार क्र. १ ते ३ हे अर्जदार हिस रोज कोणत्या ना कोणत्या कारणावरुन अपमानित करु लागले. अर्जदार हिने जाबदेणार क्र. १ यांस विचारणा केली असता, ''तुला नेहमीच तुझे मेहुने नेण्यासाठी का येतात, घरात दुसरे कोणी नाही का.'' अशाप्रकारे संशयी वृत्तीने विचारुन शिवीगाळ करत असे. जाबदेणार यांचा शारीरिक व मानसिक त्रास असहाय्य झाल्यामुळे अर्जदार हिने सदरची बाब फोनवर मेहुणे व वडिल यांना सांगितली. त्यानंतर अर्जदार हिचे मेहुणे व आई–वडिल जाबदेणार यांचे घरी आल्यामुळे जाबदेणार क्र. ४ हिचे घरी सुपेकरवाडी येथे बैठक घेण्यात आली. त्यावेळी जाबदेणार यांना अर्जदार हिस त्रास देण्याचे कारण विचारले असता, त्यांनी योग्य खुलासा दिला नाही. अर्जदार हिचे आई–वडील आणि मेहुणे यांनी तिच्या वैवाहिक जीवनाचा विचार करुन जाबदेणार यांना तिस व्यवस्थित नांदविण्याची विनंती करुन निघून आले.

४. जाबदेणार यांनी लग्नाचे वेळी अर्जदार हिचे शिक्षण पुर्ण करण्याचे मान्य केले होते. तसेच ती शहरी विभागात राहिली असुनदेखील घरातील सर्व कामे व्यवस्थित करीत असे. परंतु, लग्नातील मानपान व हुंडयाच्या कारणावरुन जाबदेणार हे अर्जदार हिस शिवीगाळ करुन मानसिक त्रास देत होते. तिने स्वयंपाक केल्यास जाबदेणार क्र. १ ते ३ खात नसे. तसेच ''हिला स्वयंपाक येत नाही, घरातील काम नीट करीत नाही'' अशाप्रकारे बोलून अर्जदार व तिच्या माहेरच्या लोकांना

अपमानित करु लागले. जाबदेणार हे संगनमत करुन अर्जदार हिस शारीरिक त्रास देवून, मारहाण करुन छळ करु लागले. अर्जदार हिने माहेरी फोन केला असता दि. २७/०२/२०२१ रोजी मौजे कोरेगाव येथे तिची बहिण व महुणे जाबदेणार यांना भेटण्यासाठी आले असता, त्यांना अपशब्द बोलून, अपमानित करुन जाबदेणार क्र. १ हा अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेवू लागल्यामुळे ती त्यांचेसोबत माहेरी निघून आली. जाबदेणार यांचा गैरसमज दुर झाल्यानंतर अर्जदाराचे महुणे व वडील हिस सासरी घेवून गेले आणि त्यांच्या विनंतीवरुन जाबदेणार यांनी अर्जदार हिस एक महिना व्यवस्थित नांदविले.

५. जाबदेणार यांच्या सवयीमुळे जाबदेणार क्र. २ ते ६ यांनी जाबदेणार क्र. १ यास चिथावणी देवून अर्जदार हिस मारहाण करणे, चारित्र्यावर संशय घेणे, उपाशी ठेवणे, माहेरच्यांबाबत अपशब्द बोलून अपमानित करुन तिला शारीरिक व मानसिक त्रास देवून छळ करीत होते. तरीसुद्धा अर्जदार ही जाबदेणार क्र. १ बरोबर संसार करण्याची ईच्छा असल्यामुळे सर्व त्रास सहन करुन नांदत होती. परंतु, जाबदेणार यांच्या वागण्यात कोणताही फरक पडला नाही. याउलट, जाबदेणार क्र. १ ने तिच्या चारित्र्याच्या संशयावरुन बेदम मारहाण करुन मेहुणे, बहिण व आई–वडिल यांच्याशी बोलणे बंद केले. तसेच २८ ते ३० एप्रिलमध्ये जाबदेणार क्र. १ हे अर्जदार हिस दररोज मारहाण करुन घरात उपाशी ठेवू लागले. जाबदेणार यांचा त्रास सहन न झाल्यामुळे मौजे कोरेगांव येथे बैठकीसाठी अर्जदार हिचे पती, सासु, सासरे, नणंद व नंदावे हजर होते. त्यावेळी जाबदेणार यांनी अर्जदार व तिचे आई–वडीलांना शिवीगाळ करुन अपमानास्पद वागणुक दिली. तसेच ''तुमची मुलगी घेवून जा, मला घटस्फोट दया, मी तिला पाच लाख रुपये पोटगी देतो, मला तिची गरज नाही, मला दुसरे लग्न करायचे आहे, तुम्ही तिला घेवून जा नाहीतर तिचे काही खरे नाही'' अशाप्रकारे शिवीगाळ

करुन अर्जदारास घराबाहेर हाकलून दिल्यामुळे अर्जदारास माहेरी तिच्या वडीलांकडे येणे भाग पडले. त्यानंतर अर्जदार हिने ब–याच वेळा जाबदेणार यास नांदण्यास नेण्यासाठी फोन केले. परंतु, जाबदेणार क्र. १ व ६ यांनी अर्जदार व तिचे वडिलास अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन धमकी दिली की, ''तुम्ही तिला नांदण्यास पाठवले तर, तिला जिवंत ठेवणार नाही, तुम्ही परत फोन केला तर तुम्हाला व तिला कधी बेपत्ता करु याचा तपास लागु देणार नाही. आमच्या ओळखीचे गोकुळनगरमध्ये गुंड आहेत, परत फोन करु नका'' अशाप्रकारे जिवे मारण्याची धमकी देवून जाबदेणार क्र. १ व ६ यांनी अर्जदार हिस नांदवण्यास नकार दिला. परंतु, तरीदेखील अर्जदार हिने जाबदेणार यांच्याविरुद्ध कोठेही पोलिस तक्रार केली नाही.

६. दि. १०/०६/२०२१ रोजी अर्जदार व वडिलांनी नांदण्यास नेण्याबाबत फोन करुन निरोप दिल्यामुळे जाबदेणार हे अर्जदाराच्या घरी बैठकीसाठी आले. त्यावेळी जाबदेणार क्र. १ ते ३ यांनी अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांनी तडजोडीबाबत शपथ घेवून नांदण्यास घेवून जाण्याची अट ठेवली. त्यामुळे अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांनी यापुढे एकमेकांवर संशय घ्यायचे नाहीत व व्यवस्थित नांदविण्याची शपथ घेवून कबुल केल्यामुळे तिचे वडीलांनी तिला जाबदेणार क्र. १ सोबत नांदण्यास पाठविले. जाबदेणार क्र. १ हे अर्जदारास जुलै २०२१ मध्ये जाबदेणार क्र. ४ च्या घरी सुपेकरवाडी येथे घेवून गेले असता व त्याच गावात कुळधरण येथे असलेल्या मंदिरामध्ये जाबदेणार क्र. १ अर्जदार हिस घेवून गेले व तिचेवर संशय घेवून ती मे महिन्यामध्ये माहेरी व्यवस्थित राहिल्याबाबत शपथ घेणेस भाग पाडले. तसेच मंदिरातून घरी येताना अर्जदार हिस जाबदेणार क्र. १ ने कॅनलवर गाडी थांबवून विषारी औषध घेवून आत्महत्या करणेस जबरदस्ती केली. अर्जदार हिने नकार दिल्यामुळे जाबदेणार क्र. ४ च्या घरी आल्यानंतर जाबदेणार क्र. ४ ने अर्जदार हिस शिवीगाळ

करुन जाबदेणार क्र. १ तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तरीदेखील अर्जदार हिची जाबदेणार क्र. १ बरोबर नांदुन संसार करण्याची पुर्वीपासुनच इच्छा होती व आहे. तसेच जाबदेणार यांचा सर्व त्रास व छळ सहन करुन अर्जदार ही जाबदेणार क्र. १ बरोबर नांदत होती.

७. दि. २९/०८/२०२१ मध्ये अर्जदार हिचे मावस भावाच्या मुलीचे लग्न असल्यामुळे अर्जदार व जाबदेणार क्र. १ हे दोघेही पुणे येथे दोन दिवस अगोदर आले होते. परंतु, जाबदेणार क्र. १ याने अर्जदारास बहिण व मेहुणे यांच्याशी कोणत्याही प्रकारचा संबंध अथवा बोलणेही करायचे नाही अशी धमकी दिली होती. अर्जदाराच्या वडिलांचे घर एका खोलीचे असल्यामुळे तिला तेथे वावरणे अशक्य झाले होते. तसेच जाबदेणार क्र. १ च्या अटीमुळे अर्जदार हिस कोणाशीही बोलणे शक्य नव्हते. त्यामुळे जाबदेणार क्र. १ हा अर्जदार हिस ''तु बहिणीशी किंवा मेहुण्याशी बोललीस तर तुला परत कोरेगावला नेणार नाही, सारखी वडिलांच्या घरात जावू नकोस नाहीतर मी तुला इथच सोडून निघुन जाईल, मला तुझी गरज नाही, तुला पाहुण्यांशी बोलायची जास्त हौस आहे'' अशाप्रकारे शिवीगाळ करुन धमकी दिली. लग्न होईपर्यंत जाबदेणार क्र. २ ते ६ यांच्या सांगण्यावरुन जाबदेणार क्र. १ हा दोन दिवस सतत शिवीगाळ करत होता. त्यानंतर दि. ०२/०९/२०२१ रोजी दुपारी जाबदेणार क्र. १ ने अर्जदार हिस बेदम मारहाण करुन शिवीगाळ करुन मौजे कोरेगांव, ता. कर्जत येथे निघून गेला. त्यानंतरदेखील अर्जदार व तिचे वडिलांनी जाबदेणार यांना नांदण्यास नेणेबाबत बरेच फोन केले, निरोप दिले परंतु, जाबदेणार यांनी तिला नांदण्यास नेले नाही. जाबदेणार यांनी अर्जदार हिस पत्नी म्हणून कधीच दर्जा दिलेला नाही. अर्जदार ही घरातील सर्व कामधंदा व्यवस्थित करीत असतांना व सर्वांशी आपुलकीने वागत असतानाही जाबदेणार यांनी अर्जदार हिचा शारीरिक व मानसिक छळ केलेला आहे. जाबदेणार यांनी अर्जदार हिचा छळ करुन खूप मोठे

नुकसान केलेले आहे. अर्जदार हिची आजही जाबदेणार बरोबर मनापासून नांदुन संसार करणेची इच्छा आहे. परंतु, जाबदेणार क्र. १ याने तिला नांदविण्यास नकार दिलेला आहे. तसेच अर्जदार हिची अन्न, वस्त्र, निवारा याकडे पुर्णपणे दुर्लक्ष करुन स्वतःची जबाबदारी टाळलेली आहे. त्यामुळे अर्जदार हिचे वैवाहिक जीवन पुर्णपणे उध्वस्त झालेले आहे. अर्जदार हिचे वडीलांची आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्याने तिला नाईलाजास्तव बहिणीकडे मौजे जेऊर, ता. पुरंदर, जि. पुणे येथे राहणे भाग पडत आहे.

८. जाबदेणार क्र. १ हा स्लायडिंग व फर्निचरचा व्यवसाय करीत असून त्यापासून त्याला दरमहा रु. ४०,०००/- ते ५०,०००/- उत्पन्न मिळत आहे. तसेच जाबदेणार क्र. २ व ३ हे मजुरी करतात. त्यामुळे जाबदेणार क्र. १ यांच्यावर कुटुंबातील कोणीही व्यक्ती अवलंबुन नाही. जाबदेणार यांची आर्थिक परिस्थिती उत्तम आहे. जाबदेणार याची अर्जदार हिला अन्न, वस्त्र, निवारा, पोटगी देण्याची ऐपत असून त्याने कधीही अर्जदार हिची चौकशी व सांभाळ केलेला नाही. जाबदेणार क्र. १ यांचे उत्पन्न चांगले असून त्यांना अर्जदार हिला नुकसान भरपाई व पोटगी देण्याची ऐपत आहे. अर्जदार हिस अन्य उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे उपासमारीत दिवस काढावे लागत आहे. जाबदेणार यांनी अर्जदार हिचे खुप मोठे आर्थिक व मानसिक नुकसान केलेले आहे. सबब, अर्जदार यांना जाबदेणार यांच्याकडून दरमहा रु. २०,०००/- प्रमाणे मुळ अर्ज दाखल तारखेपासून तुर्तातुर्त पोटगी देण्याचा हुकूम करण्यात यावा. तसेच अर्जदार मौजे जेऊर, ता. पुरंदर, जि. पुणे येथे राहण्याकरिता घरासाठी व डिपॉझिट रक्कम रुपये १०,०००/- व दरमहा घरभाडे रुपये ३,०००/- देण्याचा आदेश करण्यात यावा. तसेच जाबदेणार यांनी अथवा जाबदेणार तर्फे कोणत्याही इसमांनी अर्जदारास शारीरिक व मानसिक त्रास दिल्याच्या नुकसान भरपाई बद्दल रक्कम

रु. १०,००,०००/– देण्याचा हुकूम जाबदेणार विरुद्ध करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

९. प्रस्तुत अर्जाच्या कामी जाबदेणार क्र. १ यांना दि. ०१/१२/२०२१ रोजी नोटीस पाठविली. परंतु, त्यांनी सदर नोटीस घेण्याचे नाकारले. म्हणून सदर नोटीस दि. ०९/१२/२०२१ रोजी परत पाठविण्यात आली. त्यामुळे जाबदेणार क्र. १ विरुद्ध प्रस्तुतचा अर्ज एकतर्फा चालविण्याचा दि. १८/१२/२०२१ रोजी आदेश पारित करण्यात आला.

१०. अर्जदारतर्फे विधिज्ञ श्री. एस. आर. नाझीरकर यांनी प्रस्तुत अर्जासाठी नि. ८ अन्वये लेखी युक्तिवाद दाखल केलेला आहे.

११. अर्जातील व लेखी युक्तिवादातील कथने वाचली. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत अवलोकनावरुन माझे विचारार्थ खालील प्रश्न उपस्थित होतात. सदर प्रश्नांची उत्तरे मी खालील सविस्तर कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **<u>प्रश्न</u>** | **<u>उत्तरे</u>** |
|---|---|---|
| १. | जाबदेणार यांनी अर्जदार हिचा शारीरिक, मानसिक छळ केला आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते काय ? | **होकारार्थी.** |
| २. | अर्जदार ही दरमहा तुर्तातुर्त पोटगी व घरभाडे मिळणेस पात्र आहे काय ? | **अंशतः होकारार्थी.** |
| ३. | अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचाराची नुकसान भरपाई रक्कम रु. १०,००,०००/– मिळणेस पात्र आहे काय ? | **निरर्थक.** |
| ४. | आदेश काय ? | **अर्ज अंशतः मंजूर.** |

## :: का र ण मि मां सा ::

**प्रश्न क्रमांक १ ते ४ करीता :-**

**१२.** अर्जदार हिने स्वतःचे कथन सिद्ध करण्यासाठी स्वतःसाठी सरतपासाचे प्रतिज्ञापत्रात (नि.क्र. ६) वर दाखल केलेले आहे. सदर शपथपत्रात अर्जदार हिने अर्जातील मजकुराची पुनरावृत्ती केलेली आहे. मुख्य म्हणजे प्रस्तुत अर्जाला जाबदेणार यांनी कोणतेही म्हणणे दिलेले नाही. सबब, अर्जदाराचे शपथपत्रातील कथन अविवादित आहे. सदर शपथपत्रातील मजकुराच्या अनुषंगाने उभयपक्षातील नातेसंबंध बरोबर आहे असे दिसुन येते. त्यांचे लग्न दि. २७/११/२०२० रोजी झालेले असुन लग्नाचा संपुर्ण खर्च अर्जदार हिच्या वडिलांनी केला. अर्जदार व जाबदेणार क्र. १ चे लग्न एकमेकांच्या पसंतीने व नातेवाईकांच्या मध्यस्थीने झालेले असून जाबदेणार क्र. १ यास मानपानासाठी रु. ५०,०००/– रोख दिलेले होते.

**१३.** अर्जदार हिने शपथपत्रात पुढे असे कथन केले आहे की, जाबदेणार क्र. १ हा जाबदेणार क्र. ३ व ४ यांचे चिथावणीवरुन अर्जदारास त्रास देत असे. तसेच जाबदेणार क्र. २ व ३ लग्नातील मानपान यावरुन अपमानित करुन माहेरच्या लोकांबाबत अपशब्द बोलत असे. तरीसुद्धा अर्जदार ही जाबदेणार यांच्याकडे नांदुन घरातील सर्व कामधंदा व्यवस्थित करत होती. जाबदेणार हे अर्जदार हिच्यावर संशय घेवून तिला मारहाण करत असे व माहेरच्या लोकांशी बोलू देत नसे. जाबदेणार क्र. १ ने पुर्वीपासूनच अर्जदार हिस त्रास देवून कधीही पत्नीचा दर्जा दिलेला नाही. जाबदेणार क्र. १ ने अर्जदार हिस शारीरिक व मानसिक त्रास देवून, छळ करुन तिचे खुप मोठे नुकसान केलेले आहे. जाबदेणार क्र. १ ने अर्जदार हिची अन्न, वस्त्र, निवारा याकडे दुर्लक्ष करुन स्वतःची जबाबदारी टाळलेली आहे. त्यामुळे अर्जदार हिचे वैवाहिक जीवन उध्वस्त झाले आहे.

जाबदेणार क्र. १ हा स्लायडिंग व फर्निचरचा व्यवसाय करीत असुन त्यापासून त्यास दरमहा रु. ४०,०००/– ते ५०,०००/– उत्पन्न मिळत आहे. तसेच जाबदेणार क्र. २ व ३ हे मजुरी करतात. त्यामुळे जाबदेणार क्र. १ यांची आर्थिक परिस्थिती उत्तम असून त्याच्यावर कुटुंबातील कोणीही अवलंबुन नाही. जाबदेणार क्र. १ याची अर्जदारास अन्न, वस्त्र, निवारा व पोटगी देण्याची ऐपत असून त्यांनी कधीही तिची चौकशी व सांभाळ केलेला नाही. परंतु, अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे तिला उपासमारीत दिवस काढावे लागत आहे. जाबदेणार यांनी अर्जदार हिचे खूप मोठे आर्थिक नुकसान केलेले आहे. त्यामुळे अर्जदारास सदर अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

**१४.** वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदाराचा पुरावा अविवादित असल्याने जाबदेणार क्र. १ यांनी जाबदेणार क्र. २ ते ६ यांच्या चिथावणीवरुन अर्जदार हिस शारीरिक व मानसिक त्रास देवून कौटुंबिक हिंसाचार केला. याउपरांत, संरक्षण अधिकारी, पुरंदर यांनी दिलेल्या कौटुंबिक घटना अहवालाचे वाचन केले असता अर्जदाराला जाबदेणार यांनी शिवीगाळ करुन मारहाण केली, जबरदस्तीने विष पाजून मारण्याचा प्रयत्न केला, तसेच अर्जदारास उपाशी ठेवून रात्रीच्या वेळी दोन वेळा घराबाहेर काढले, अर्जदाराच्या वडिलांकडे पैशांची मागणी केली, अशाप्रकारे अर्जदारास शारीरिक व मानसिक त्रास देवून कौटुंबिक हिंसाचार केला असे प्रथमदर्शनी दिसून येते. अर्जदार हिने जाबदेणार क्र. १ याच्याकडून दरमहा रुपये २०,०००/–, दरमहा घरभाडे रुपये ३,०००/– अशी एकूण दरमहा रक्कम रुपये २३,०००/– आणि घराच्या डिपॉझिटसाठी रुपये १०,०००/– रक्कम मिळावी अशी मागणी केलेली आहे. जाबदेणार क्र. १ चा फर्निचर आणि स्लाईडिंगचा व्यवसाय असल्याने जाबदेणार क्र. १ यास रु. ४०,०००/– ते ५०,०००/– प्रतिमाह इतके उत्पन्न मिळते. परंतु, अर्जदार हिने प्रस्तुत कथनापृष्ठयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला

नाही. असे असले तरी अर्जदाराचे कथन विना आव्हानित आहे. त्यामुळे अर्जदाराच्या कथनावर अविश्वास दाखविण्याचे कोणतेही कारण मला निदर्शनास येत नाही. तसेच कोणताही सक्षम व्यक्ती मोलमजुरी करुन साधारण रुपये १०,०००/– प्रतिमहा सहज कमवू शकतो.

**१५.** जाबदेणार क्र. १ याची अर्जदाराचा पती या नात्याने सामाजिक आणि नैतिक जबाबदारी आहे की, त्याने अर्जदाराचे पालन–पोषण करावे. परंतु, जाबदेणार क्र. १ याने अर्जदार हिची चौकशी व सांभाळ केलेला नसून स्वतःच्या नैतिक जबाबदारीकडे दुर्लक्ष केलेले आहे. अर्जदार हिने असे कथन केले आहे की, जाबदेणार क्र. १ वर कोणीही अवलंबुन नाही. परंतु, प्रस्तुत अर्जात कथन केल्याप्रमाणे जाबदेणार क्र. १ ते ३ हे एकत्रात राहत असून जाबदेणार क्र. २ व ३ हे जाबदेणार क्र. १ चे आई–वडील आहेत. त्यामुळे जाबदेणार क्र. १ वर कोणीही अवलंबून नाही असे अर्जदाराचे कथन संयुक्तिक दिसून येत नाही.

**१६.** अर्जदार हिने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार ही दुस–यावर अवलंबून आहे. अर्जदाराच्या वडिलांची आर्थिक परिस्थिती हालाकिची असल्यामुळे अर्जदार ही नाईलाजास्तव बहिणीकडे मौजे जेऊर, ता. पुरंदर, जि. पुणे येथे राहते. जाबदेणार क्र. १ चे उत्पन्न चांगले असून अर्जदार हिस नुकसान भरपाई व पोटगी देण्याची ऐपत आहे. वर नमुद केल्याप्रमाणे कोणताही सक्षम व्यक्ती मोलमजुरी करुन दरमाह रु. १०,०००/– सहज कमवू शकतो. त्यामुळे अर्जदार हिला अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय उपचारासाठी जाबदेणार क्र. १ यांचेकडून दरमहा रुपये ३,०००/– इतकी रक्कम देणे योग्य राहील. परंतु, अर्जदार सध्या जेऊर येथे राहत आहे यासाठी अर्जदार हिने कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केलेला नाही. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या

आदेशान्वये अर्जदाराने स्वतःचे उत्पन्न व मालमत्ता संबंधीचे विवरण (asset and liability) दाखल केलेले नाही. त्यामुळे घरभाडे व डिपॉझिट संबंधी आदेश करणे योग्य होणार नाही.

**१७.** प्रस्तुत अर्जदाराने प्रस्तुत अर्जान्वये नुकसान भरपाई रक्कम रुपये १०,००,०००/- मिळावी अशी विनंती केली आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणात जाबदेणार यांचे म्हणणे आलेले नाही. सदरचा अर्ज तुर्तातुर्त पोटगीसाठी असून सुरुवातीच्या टप्प्यावर आहे. प्रस्तुतचा अर्ज गुणदोषावर निर्णित झालेला आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे मुद्दा क्र. ३ हा प्रस्तुतचा मुख्य अर्ज गुणदोषावर निर्णित करतेवेळी विचारात घेणे योग्य होईल. सबब, प्रश्न क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित असून प्रश्न क्र. २ चे उत्तर त्या अनुषंगाने नोंदवित आहे आणि प्रश्न क्र. ४ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** अर्जदाराचा अर्ज अशंतः मंजूर करणेत येत आहे.

**२.** जाबदेणार क्र. १ यास असे आदेशित करणेत येते की, त्याने अर्जदार हिला तुर्तातुर्त पोटगीची रक्कम म्हणून दरमहा रूपये ३,०००/- (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) अर्ज दाखल तारखेपासून ते प्रस्तुत प्रकरण निकाली होईपर्यंत द्यावेत.

**सही/-**

दिनांक ०९/०२/२०२२

**(श्रीमती डी. एम. पाटील)**

ठिकाण सासवड.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

सासवड.

**-: C E R T I F I C A T E :-**

"I affirmed that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer (Grade 3) | : | Mrs. S. R. Kamble |
| Name of the P. O. | : | Smt. D. M. Patil, C.J.J.D |
| | | & J.M.F.C., Saswad. |
| Date of Order | : | 09/02/2022 |
| Order signed by presiding officer on | : | 09/02/2022 |
| Order uploaded on | : | 11/02/2022 |